# बंदिस्त शेळीपालन- सुधारित मार्गदर्शक सूचना

(प्रकल्प उपक्रम सांकेतांक-A2.5.1)

**प्रस्तावना :**

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदला विषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून, भू-गर्भातील पाणी साठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. तसेच पूर्णा नदीच्या खो-यातील भू-भाग हा निसर्गत:च क्षारपड असल्याने शेतीसाठी सिंचनास मर्यादा येत आहेत. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्पभू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

या घटकांतर्गत प्रकल्प क्षेत्रामध्ये शेळी पालनाद्वारे शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न मिळवून देण्यासाठी तसेच ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होण्याच्या दृष्टीने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत “बंदिस्त शेळीपालन ” या घटकाचा समावेश करण्यात आलेला आहे.

**उद्देश:**

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पात समावेश करण्यात आलेल्या गाव समूहात “बंदिस्त शेळीपालन” या घटकाद्वारे शेळी पालनाद्वारे भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती, विधवा, परितक्त्या महिला, घटस्फोटीत महिला, अनुसूचित जाती/जमाती मधील महिला शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न मिळवून देणे.
२. ग्रामीण भागातील युवकांना कृषि क्षेत्रात स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे.
३. स्थानिक वातावरणात तग धरतील अशा प्रजातींच्या पैदासक्षम शेळ्यांचे संगोपन करणे.
४. ग्रामीण भागातील शेळीपालन व्यवसायास चालना मिळावी, त्याद्वारे लाभार्थींना व त्यांचे कुटुंबांना प्रथिनयुक्त आहार मिळवा.

**लाभार्थी निवडीचे निकष**

प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या गावासाठीच्या ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) मान्यता दिलेले भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती, विधवा, परितक्त्या महिला, घटस्फोटीत महिला, अनुसूचित जाती/जमाती मधील महिला शेतकरी यांना लाभ देय राहील.

**अर्थसहाय्य**

**या घटकाअंतर्गत शेळ्यांची खरेदी, निवारा, खाद्याची व पाण्याची भांडी, आरोग्य सुविधा व औषधोपचार या बाबी विचारात घेऊन (१० शेळ्या व १ बोकड) उस्मानाबादी/संगमनेरी शेळीसाठी रु. ८८०००/- व स्थानिक शेळ्यांसाठी रु. ६५०००/- प्रमाणे आर्थिक मर्यादा देय आहे.**

| अ.क्र | बंदिस्त शेळीपालन (१० शेळ्या + १ बोकड) | | |
|---|---|---|---|
| | तपशील | दर | १० शेळ्या + १ बोकड रक्कम रु. |
| १ | शेळ्या खरेदी | रु. ६०००/- प्रती शेळी (उस्मानाबादी / संगमनेरी जातीच्या)<br>रु. ४०००/- प्रती शेळी (अन्य स्थानिक पैदासक्षम) | रु. ६०००० /- (१० शेळ्या)<br>रु. ४००००/-(१० शेळ्या) |
| २ | बोकड खरेदी | रु. ७०००/-प्रती बोकड (उस्मानाबादी/संगमनेरी जातीचा नर)<br>रु.५०००/- प्रती बोकड (अन्य स्थानिक पैदासक्षम नर) | रु. ७००० /- (१ बोकड)<br>रु. ५०००/-(१ बोकड) |
| ३ | शेळ्या व बोकडाचा विमा | — | रु. २७५० /- ( उस्मानाबादी / संगमनेरी जातींसाठी)<br>रु.१७५० /- (अन्य जातींसाठी) |
| ५ | शेळ्यांचा वाडा<br>प्रती शेळी २० चौ.फु.,<br>प्रती बोकड २५ चौ.फु. | रु.७० चौ.फु. प्रमाणे | रु. १५७५० /-<br>(२२५ चौ.फु. करिता) |
| ६ | खाद्याची व पाण्याची भांडी | — | रु. १००० /- |
| ७ | आरोग्य सुविधा व औषधोपचार | — | रु. १५०० /- |
| | **एकूण खर्च** | — | **रु. ८८०००/- ( उस्मानाबादी / संगमनेरी जातींसाठी)<br>रु. ६५००० /- (अन्य स्थानिक जातींसाठी)** |

**(संदर्भ :- कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक : पविआ-२०११/प्र.क्र. ७४/पदुम-३, दिनांक-२ जुलै, २०११ व १६ सप्टेंबर २०११ )**

**वरील मापदंडानुसार खर्च अनुदानासाठी ग्राह्य धरला जाईल व जास्तीचा खर्च लाभार्थीने स्वत: करावयाचा आहे.**

**लाभार्थ्यांना देय अनुदान खालीलप्रमाणे -**

| उस्मानाबादी /संगमनेरी शेळीसाठी | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बंदिस्त शेळीपालन (शेळी + बोकड) | | १०+१ | ९+१ | ८+१ | ७+१ | ६+१ | ५+१ | ४+१ | ३+१ |
| **एकूण खर्च (उस्मानाबादी /संगमनेरी)** | | **८८०००** | **८००००** | **७२०००** | **६४०००** | **५६०००** | **४८०००** | **४००००** | **३२०००** |
| अनुदान | सर्व साधारण लाभार्थी ( ५० % ) | ४४००० | ४०००० | ३६००० | ३२००० | २८००० | २४००० | २०००० | १६००० |
| | अनुसूचित जाती व जमाती ( ७५ %) | ६६००० | ६०००० | ५४००० | ४८००० | ४२००० | ३६००० | ३०००० | २४००० |
| निवाऱ्याची सोय उपलब्ध केली नसल्यास खालीलप्रमाणे अनुदान देय राहील. | | | | | | | | | |
| अनुदान | सर्व साधारण लाभार्थी ( ५० % ) | ३६१२५ | ३२८२५ | २९५२५ | २६२२५ | २२९२५ | १९६२५ | १६३२५ | १३०२५ |
| | अनुसूचित जाती व जमाती ( ७५ %) | ५४१८८ | ४९२३८ | ४४२८८ | ३९३३८ | ३४३८८ | २९४३८ | २४४८८ | १९५३८ |

| स्थानिक शेळीसाठी | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बंदिस्त शेळीपालन (शेळी + बोकड) | | १०+१ | ९+१ | ८+१ | ७+१ | ६+१ | ५+१ | ४+१ | ३+१ |
| **एकूण खर्च ( स्थानिक जाती )** | | **६५०००** | **५९०९०** | **५३१८१** | **४७२७२** | **४१३६३** | **३५४५४** | **२९५४५** | **२३६३६** |
| अनुदान | सर्व साधारण लाभार्थी ( ५० % ) | ३२५०० | २९५४५ | २६५९१ | २३६३६ | २०६८२ | १७७२७ | १४७७३ | ११८१८ |
| | अनुसूचित जाती व जमाती ( ७५ %) | ४८७५० | ४४३१८ | ३९८८६ | ३५४५४ | ३१०२२ | २६५९१ | २२१५९ | १७७२७ |
| **निवाऱ्याची सोय उपलब्ध केली नसल्यास खालीलप्रमाणे अनुदान देय राहील.** | | | | | | | | | |
| अनुदान | सर्व साधारण लाभार्थी ( ५० % ) | २४६२५ | २२३७० | २०११६ | १७८६१ | १५६०७ | १३३५२ | ११०९८ | ८८४३ |
| | अनुसूचित जाती व जमाती ( ७५ %) | ३६९३८ | ३३५५६ | ३०१७४ | २६७९२ | २३४१० | २००२९ | १६६४७ | १३२६५ |

**या घटका अंतर्गत अर्थसहाय्य मिळणेसाठी किमान ३ शेळ्या व १ बोकड यांची खरेदी अनिवार्य आहे. शेळी खरेदी करताना शेळीचे वय किमान १ वर्ष व बोकडाचे वय किमान २ वर्ष असणे आवश्यक आहे. या घटकासाठी अर्ज केलेल्या परंतु अद्याप शेळ्या खरेदी न केलेल्या सर्व अर्जदारांना वरीलप्रमाणे लाभ देय राहील. यापूर्वी लाभार्थ्याकडे शेळ्या असल्यास जुन्या व नवीन शेळ्या मिळून एकूण संख्या (१०+१=) ११ होईल या मर्यादेपर्यंत निवडलेल्या लाभार्थ्यास लाभ देय राहील. प्रकल्प कालावधीमध्ये या घटकाचा लाभ लाभार्थीस एकदाच देय आहे.**

## अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या-

### लाभार्थी

१. इच्छुक लाभार्थीने घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठी अर्ज प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

२. पूर्वसंमती मिळाल्या पासून एक महिन्याच्या आत शेळ्या खरेदी कराव्यात.

३. निवडलेल्या लाभार्थीने **ग्राम कृषि संजीवनी समिती स्तरावर** गठीत खरेदी समितीच्या उपस्थितीत शेळ्या खरेदी कराव्यात.

**४. शेळ्या खरेदी लाभार्थ्याने यासाठीच्या अधिकृत बाजार समिती / पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी मेंढी विकास महामंडळ, पुणे मार्फत करावी व बाजार समितीची/ महामंडळाची खरेदी तपशिलासह पावती सादर करावी.**

५. शेळ्या खरेदीनंतर वाहतुकीचा खर्च लाभार्थीने करावयाचा आहे.

**६. शेळ्यांसाठी आवश्यक असल्यास आवश्यक आकारमानाचा वाडा व निवाऱ्याची सोय स्थानिक अथवा बाजारातून साहित्य घेऊन लाभार्थीने करावयाची आहे.**

**७. खाद्याची व पाण्याची भांडी, आरोग्य सुविधा व औषधोपचार या बाबतची काळजी दिलेल्या अर्थ सहाय्यामधून लाभार्थ्याने घ्यावयाची आहे.**

८. या योजनेखाली खरेदी केलेल्या शेळ्यांचा विमा लाभार्थी व संबधित उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या संयुक्त नावे ३ वर्षासाठी करण्यात यावा.

९. शेळ्या खरेदीनंतर अनुदान मिळणेसाठी ऑनलाईन मागणी करावी आणि स्वसाक्षांकित केलेली मूळ खरेदी बिले व खरेदी समितीचे प्रमाणपत्र लाभार्थ्याने संकेतस्थळावर अपलोड करावे.

१०. पूर्वी प्रकल्पांतर्गत शेळ्या खरेदी केलेल्या लाभार्थ्यांनी अनुदान मिळणेसाठी विहित नमुन्यात **(प्रपत्र-६)** मागणी करून स्वसाक्षांकित केलेली मूळ खरेदी देयके संकेतस्थळावर अपलोड करावीत.

**शेळ्या खरेदी समिती :-**

१. सरपंच - पदसिद्ध अध्यक्ष
२. उपसरपंच - पदसिद्ध सदस्य
३. इतर ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC) सदस्यांपैकी एक महिला सदस्य - सदस्य
४. कृषि मित्र/कृषि ताई - सदस्य
५. कृषि सहाय्यक - सचिव
६. पशुसंवर्धन विभागाचे संबधित पशुधन विकास अधिकारी/पशुधन पर्यवेक्षक-सदस्य
   (अनुक्रमांक १, २, ३ पैकी किमान १ सदस्य, कृषि मित्र/कृषि ताई, कृषि सहाय्यक, पशुसंवर्धन विभागाचे संबधित पशुधन विकास अधिकारी/पशुधन पर्यवेक्षक व लाभार्थी यांची खरेदीच्या वेळी उपस्थिती अनिवार्य)

**खरेदी समितीच्या कार्य व जबाबदाऱ्या :-**

१. खरेदी समितीने शेळी खरेदी कोणत्या बाजार समितीमधून करावयाची आहे याबाबत निर्णय उपविभागीय कृषि अधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार घ्यावा.
२. लाभार्थीनी प्रत्यक्ष शेळ्या खरेदी केल्या असल्याबाबतचे प्रमाणपत्र खरेदी समितीने सादर करावे.
३. गावातील निवडलेल्या सर्व लाभार्थ्यांची शेळ्यांची खरेदी शक्यतो एकाचवेळी करावी.

**शेळ्या खरेदी करताना खरेदी समितीचा जाण्या येण्याचा खर्च राज्य परिवहन महामंडळाच्या बसच्या दरानुसार ग्राम कृषि संजीवनी समितीच्या (VCRMC) निधीतून करावा.**

**ग्राम कृषि संजीवनी समिती**

१. प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या गावातील ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती, विधवा, परितक्त्या महिला, घटस्फोटीत महिला, अनुसूचित जाती/जमाती मधील महिला शेतकरी यामधील गरजू शेतकऱ्यांची निवड करावी.
२. भूमिहीन कुटुंबातील व्यक्तीसाठी तलाठी/तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र व इच्छुक लाभार्थ्याने दिलेले सोबतच्या नमुन्यातील स्वयंघोषणा पत्र याआधारे लाभार्थी निवडीबाबत निर्णय घ्यावयाचा आहे.
३. विधवा, परितक्त्या व घटस्फोटीत महिलांना लाभ देणेसाठी ग्रामसेवक यांचे अभिप्राय व इच्छुक लाभार्थ्यांचे सोबतच्या नमुन्यातील स्वयंघोषणा पत्र घेऊन त्याआधारे लाभार्थी निवडीचा निर्णय घ्यावयाचा आहे.
४. सर्व इच्छुक लाभार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची छाननी करून अर्जाच्या पात्र/अपात्रते बाबत निर्णय घ्यावा. अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.
५. शेळी खरेदी समिती नियुक्त करून तिच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे.
६. सामाजिक लेखापरीक्षण करणे.

**समूह सहाय्यक**

१. इच्छुक लाभार्थी यांना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेतस्थळावर https://dbt.mahapocra.gov.in नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करावी.
२. पात्र लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी व इच्छुक लाभार्थ्यांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांची छाननी लाभार्थी निकषानुसार करावी.
३. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि संजीवनी समिती समोर मान्यतेसाठी सादर करणे व मंजुरी प्राप्त झाल्यानंतर तसा ठराव संकेतस्थळावर अपलोड करणे.

४. लाभार्थ्यास "बंदिस्त शेळीपालन" या घटकाच्या अटी शर्ती, तांत्रिक निकष, देय अनुदान याबाबत समजावून सांगणे.
५. शेळ्या खरेदी झाल्यानंतर संबंधित कृषि सहाय्यक यांना शेळी खरेदी व खरेदी पश्चात तपासणीसाठी मदत करणे.
६. पात्र लाभार्थ्यांना पूर्वसंमती बाबत अवगत करून तपशिलासह माहिती देणे.

**कृषि सहाय्यक**

१. लाभार्थीने ऑनलाईन अर्जासोबत अपलोड केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे.
२. अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या छानणी आधारे पात्र अर्जांच्या नियोजित प्रकल्प स्थळाची पाहणी **करताना निवड झालेल्या लाभार्थ्याकडे यापूर्वी शेळ्या आहेत किंवा नाही याबाबत खातरजमा करून व मागणी रास्त असल्याची खात्री करून प्रपत्र-१ नुसार** प्रकल्प स्थळ बंदिस्त शेळी पालनासाठी योग्य आहे किंवा नाही, याबाबत अहवाल ऑनलाईन नोंद करावा. DBT App द्वारे **प्रकल्प स्थळाचा नैऋत्य कोपऱ्यावरून लाभार्थी व कृषि सहाय्यकाच्या छायाचित्रासह** भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करून संकेतस्थळावर अपलोड करणे. यापूर्वी शेळीपालनाचा इतर शासकीय योजनेतून लाभ घेतला आहे काय, याबाबत खातरजमा करून याबाबतचा तपशिल नमूद करावा.
३. कृषि सहाय्यक यांनी खरेदी करण्यात आलेल्या शेळ्या **मार्गदर्शक सूचनेनुसार** योग्य असल्याबाबत व खरेदी प्रक्रिया योग्य असल्याबाबत नुसार मोका तपासणी अहवाल संकेतस्थळावर अनुदानाच्या शिफारशीसह उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करावा. तसेच DBT App द्वारे **प्रकल्प स्थळाचा नैऋत्य कोपऱ्यावरून** अक्षांश/रेखांशसह **लाभार्थी, कृषि सहाय्यक व शेळ्यांच्या छायाचित्रासह** भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करून संकेतस्थळावर अपलोड करणे.
**४. आवश्यक आकारमानाचा वाडा व निवाऱ्याची सोय लाभार्थ्याकडे स्वत: च्या जागेवर उपलब्ध असल्याची खात्री करून यासाठीचे देय अर्थसहाय्य देण्यासाठी शिफारस करावयाची आहे.**
**५. पाण्याची व खाद्याची भांडी, आरोग्य सुविधा व औषधोपचार या बाबतची काळजी दिलेल्या अर्थसहाय्यामधून लाभार्थ्याने घेतले असलेबाबत खात्री करावी, नसल्यास मार्गदर्शन करावे व देय अनुदान अदा करणेसाठी शिफारस करावी.**
**६. अनुदान मागणीसाठी दि.१६/३/२०१९ च्या सूचनेनुसार साक्षांकित देयके व आवश्यक कागदपत्रे प्रमाणित करून संकेतस्थळावर अपलोड करणे.**
**७.** पूर्वी प्रकल्पांतर्गत शेळ्या खरेदीचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांनी वाडा, निवारा, खाद्य व पाण्याची भांडी, औषधोपचार सुविधा उपलब्ध केल्याची खात्री करून विहित नमुन्यातील मोका तपासणी अहवाल **(प्रपत्र-७)** संकेतस्थळावर अनुदानाच्या शिफारशीसह अपलोड करावा व उपविभागीय कृषि अधिकारी यांना देय अनुदान अदा करण्यास शिफारस करावी.

➢ **यापूर्वी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत शेळी खरेदी केलेल्या लाभार्थ्यांसाठी निवारा, खाद्य व पाण्यासाठी भांडी आणि औषधोपचारासाठी देय अनुदान:**

**ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वीच या घटकाअंतर्गत अर्ज करून शेळ्या खरेदी केलेल्या आहेत व अनुदान प्राप्त झाले आहे त्यांना आवश्यक असल्यास उस्मानाबादी/संगमनेरी व स्थानिक जातीच्या शेळी संगोपनासाठी वाडा/निवारा, खाद्य व पाण्याची भांडी, आरोग्य सुविधा व औषधोपचारासाठी खालील प्रमाणे अनुदान देय आहे.**

| उस्मानाबादी /संगमनेरी व स्थानिक शेळीसाठी | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बंदिस्त शेळीपालन | प्रमाण | १०+१ | ९+१ | ८+१ | ७+१ | ६+१ | ५+१ | ४+१ | ३+१ |
| शेळ्यांचा वाडा प्रती शेळी २० चौ.फु., प्रती बोकड २५ चौ.फु. | रु.७० चौ.फु. प्रमाणे | रु. १५७५० (२२५ चौ.फु. करिता) | १४३५० | १२९५० | ११५५० | १०१५० | ८७५० | ७३५० | ५९५० |
| खाद्याची व पाण्याची भांडी | - | रु. १००० | १००० | ९०० | ८०० | ७०० | ६०० | ५०० | ४०० |
| आरोग्य सुविधा व औषधोपचार | रु.१३६/- प्रती शेळी /बोकड | रु. १५०० | १३६० | १२२४ | १०८८ | ९५२ | ८१६ | ६८० | ५४४ |
| एकूण | — | रु. १८२५० | १६७१० | १५०७४ | १३४३८ | ११८०२ | १०१६६ | ८५३० | ६८९४ |
| सर्व साधारण लाभार्थी (५० %) | अनुदान | रु. ९१२५ | ८३५५ | ७५३७ | ६७१९ | ५९०१ | ५०८३ | ४२६५ | ३४४७ |
| अनुसूचित जाती व जमाती (७५ %) | | रु. १३६८८ | १२५३३ | ११३०६ | १००७९ | ८८५२ | ७६२५ | ६३९८ | ५१७१ |

**शेळी खरेदी करून अनुदानाचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना सदर अनुदान देय असलेबाबत प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्तरावरून लघु संदेश पाठवण्यात येईल, तसेच उपविभागीय कृषि अधिकारी स्तरावर सदर शेतकऱ्यांची यादी समूह सहाय्यक व कृषि सहाय्यक यांना उपलब्ध करून देण्यात यावी. समूह सहाय्यक मार्फत त्यांना वरीलप्रमाणे अनुदान देय असल्याबाबत माहिती द्यावी व देय अनुदानाबाबत व लाभार्थ्याने करावयाच्या कार्यवाही बाबत सक्रीय मार्गदर्शन करायचे आहे.**

**आवश्यक आकारमानाचा वाडा / निवारा उभारणी नंतर खाद्य व पाण्यासाठी भांडी, उपलब्धतेनंतर संबंधित लाभार्थ्याने सोबतच्या पत्रानुसार (प्रपत्र-६) अनुदान मागणी करायची आहे.**

### कृषि पर्यवेक्षक

कृषि सहाय्यक यांनी ऑनलाईन अवगत केल्यानंतर कृषि पर्यवेक्षक यांनी अनुदान अदायगी पूर्वी लाभार्थी संख्येच्या २५% तपासणी करावी. अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून पर्यवेक्षकीय अहवाल सादर करावा.

### उपविभाग स्तर (लेखाधिकारी)

अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यासाठीचे लेखाधिकारी उपविभागस्तर यांनी मार्गदर्शक सूचनेनुसार अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून पात्र प्रस्तावांना उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.

### उपविभागीय कृषि अधिकारी

१. ग्राम कृषि संजीवनी समितीच्या (VCRMC) मान्यतेने प्राप्त झालेल्या लाभार्थींच्या कागदपत्रांची छाननी नंतर पात्र/ अपात्रते बाबत निर्णय घेऊन संबंधित लाभार्थी यांना ऑनलाईन पूर्वसंमती प्रदान करावी. लाभार्थी अपात्र असल्यास कारणे नमूद करावीत.

२. तपासणी अहवालासह ऑनलाईन शिफारस झालेल्या अनुदान प्रस्तावांची पडताळणी करून योग्य प्रस्तावांना DBT द्वारे थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर अनुदान अदायगी करण्यास मंजुरी द्यावी.
३. कृषि सहाय्यक यांनी अवगत केल्यानंतर यादृच्छिक (Random) पद्धतीने ५% लाभार्थ्यांची अनुदान अदायगी पूर्वी तपासणी करावी.
४. योजनेचे संनियंत्रण करणे.

**प्रकल्प संचालक, आत्मा**

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. उपविभाग स्तरावर झालेल्या कामांची यादृच्छिक (Random) पद्धतीने किमान १% लाभार्थ्यांची तपासणी करावी व विहित प्रपत्रात अहवाल सादर करावा.

## योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना

**१. पात्र इच्छुक लाभार्थ्यांची यादी व अनुदान प्राप्त लाभार्थ्यांची यादी दर्शनी भागात लावण्यात यावी.**
२. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देता येईल .
३. पात्र लाभार्थ्याने सदरचा व्यवसाय किमान ३ वर्षे करणे आवश्यक आहे .
४. या घटकास नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेतस्थळावर, ग्रामसभा कार्यालयातील नोटीस बोर्ड, कार्यमहिमा, मेळावे इत्यादीद्वारे व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.
५. या घटकांतर्गत निवड केलेल्या लाभार्थ्यांना शेळी पालनाचे आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
६. या घटकांतर्गत लाभार्थ्यांना पुरवठा केलेल्या शेळ्यांना लसीकरण व आवश्यक त्या पशुवैद्यकीय सेवा जवळच्या पशुवैद्यकीय संस्थेमार्फत उपलब्ध होतील याबाबत नियोजन करावे.

## प्रपत्र -१
## प्रकल्प स्थळ पाहणी व पात्रतेबाबत अभिप्राय

श्री/ श्रीमती--------------------------------------------------------- यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत -------------------------------- घटकासाठी अर्ज केलेला आहे. **सदर लाभार्थ्याकडे सध्या ------ शेळ्या असून/नसून, लाभार्थ्याने मागणी केलेली संख्या ----शेळ्या व ---- बोकड मार्गदर्शक सूचनेनुसार रास्त आहे. सदर घटकासाठी लाभार्थ्याकडे स्वत:ची पुरेशी जागा उपलब्ध आहे.** सदर लाभार्थ्याने यापूर्वी या घटकाचा इतर शासकीय योजनेतून लाभ घेतलेला आहे/ नाही. सदर अर्ज ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) दिनांक -------रोजीच्या बैठकीमध्ये मंजूर केलेला आहे. सदर लाभार्थी योजनेच्या निकषाप्रमाणे पात्र आहे. दिनांक --------------- रोजी भेट देऊन प्रकल्प स्थळाची पाहणी केली असता बंदिस्त शेळीपालन घटकासाठी आवश्यक साधन सामुग्री लाभार्थ्याकडे उपलब्ध असून प्रकल्प राबविण्यासाठी लाभार्थी सक्षम व पात्र आहे. त्यामुळे सदर लाभार्थ्यास पूर्वसंमती देणेस शिफारस करण्यात येत आहे.

**कृषि सहाय्यक**

**नाव**

**स्वाक्षरी**

**दिनांक**

# प्रपत्र -२
# पूर्वसंमती पत्र

घटक- बंदिस्त शेळीपालन

(प्रकल्प उपक्रम सांकेतांक- A2.5.1)

कार्यालय- उपविभागीय कृषि अधिकारी, ____
उपविभाग ________, जिल्हा________
दिनांक -      /      /२०----

प्रति,
श्री/श्रीमती------------------------------------------
मु.पो.------------------तालूका --------------------
जिल्हा -------------

| | | |
|---|---|---|
| १. | आपल्या अर्जाचा दिनांक | |
| २. | मागणी अर्जाचा क्रमांक | |
| ३. | मागणी केलेला घटक | |
| ४. | मागणी केलेल्या घटकाचा कोड | |
| ५. | ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC) ने लाभार्थी निवड आणि अर्जाला मान्यता देण्याचा दिनांक | |
| ६. | अर्जानुसार ८-अ चा क्रमांक | |
| ७. | घटक राबवावयाचा गट क्र./सर्व्हे नं. | |
| ८. | स्थळ पाहणी करून कृषि सहाय्यकाने शिफारस केल्याचा दिनांक | |
| ९. | घटक राबविण्यासाठीचा कालावधी (दिवस) | |

वरील अर्जाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते कि, ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC( वरील ठरावान्वये आपली लाभार्थी म्हणून निवड केलेली आहे. सदर निवड आपण प्रकल्पाच्या अटी व शर्तीच्या पूर्तता करण्याचे अधिन राहून करण्यात आली आहे. आपल्या मागणीनुसार बंदिस्त शेळीपालन या बाबीसाठी प्रकल्पांतर्गत मार्गदर्शक सूचनेनुसार अनुज्ञेय रकमेसाठी पूर्वसंमती देण्यात येत आहे. सदरचे पूर्वसंमतीपत्र दिल्याच्या तारखेपासून दिलेल्या मुदतीत ग्राम कृषि संजीवनी समिती मार्फत नियुक्त खरेदी समिती समवेत शेळ्या खरेदी करणे आवश्यक आहे. सदर घटकासाठी लाभार्थ्याने सर्व खर्च अगोदर करावयाचा आहे. घटकाची अंमलबजावणी पूर्ण करून आवश्यक कागदपत्र https://dbt.mahapocra.gov.in या संकेतस्थळावर किंवा DBT app वर अपलोड करून अनुदान मागणी करणे आवश्यक आहे. विहित मुदतीत खरेदी पूर्ण न केल्यास आपणास दिलेले पूर्वसंमती पत्र आपोआप रद्द समजण्यात यावे.

सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनेनुसार पूर्ण झाल्याची खात्री झाल्यानंतर आपला प्रस्ताव प्रत्यक्ष मोका तपासणीनुसार देय अनुदानासाठी पात्र राहिल. आपला प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर मार्गदर्शक सुचना व मंजूर मापदंड/प्रत्यक्ष खर्चानुसार अनुज्ञेय अनुदान निधी उपलब्धतेनूसार मंजूर करण्यात

येईल. सदरचे अनुदान आपल्या आधार संलग्न बँक खात्यावर DBT द्वारे जमा करण्यात येईल. आपल्या प्रस्तावास मंजूरी देणे, देय अनुदानाची रक्कम/देय कालावधी इत्यादी बाबी ठरविण्याचा अंतिम अधिकार नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प/शासनाचा राहील.

घटक अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना www.mahapocra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी संबधित कृषि सहाय्यक यांचेकडे संपर्क साधावा.

**उपविभागीय कृषि अधिकारी,**
**उपविभाग________**
**जिल्हा: _________**

# प्रपत्र - ३
# खरेदी समितीने द्यावयाचे खरेदी प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, लाभार्थी श्री/श्रीमती----------------------------------------------- मु.पो.------------------------तालूका ---------------------- जिल्हा ----------------- यांनी शेळीपालन या घटकांतर्गत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत या घटकासाठी विहित केलेल्या खरेदी समिती व खरेदी समिती सचिव (कृषि सहाय्यक) यांच्या समक्ष सदर घटकासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून -------शेळ्या व -----बोकड असे एकूण -----शेळी खरेदी करणेचे काम समाधान कारकरित्या पूर्ण केलेले आहे.

खरेदी केलेल्या शेळ्यांची संख्या -

एकूण किंमत रु. -

(अक्षरी रु. )

| | (स्वाक्षरी)<br>लाभार्थी | (स्वाक्षरी)<br>खरेदी समिती सचिव<br>(कृषि सहाय्यक) | (स्वाक्षरी)<br>उपस्थित खरेदी समिती सदस्य |
|---|---|---|---|
| दिनांक-<br>ठिकाण- | (नाव ) | (नाव ) | (नाव ) |

| (स्वाक्षरी)<br>उपस्थित खरेदी समिती कृषि मित्र/ कृषि ताई | (स्वाक्षरी)<br>पशुसंवर्धन विभागाचे संबधित पशुधन विकास अधिकारी/पशुधन पर्यवेक्षक |
|---|---|
| (नाव ) | (नाव ) |

## प्रपत्र - ४
## मोका तपासणी अहवाल
## (कृषि सहाय्यक यांनी करणे)

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | लाभार्थ्याचे नाव | |
| २. | गावाचे नाव | |
| ३. | तपासणी दिनांक | |
| ४ . | बाब | शेळीपालन |
| ५. | पूर्वसंमती दिनांक | |
| ६. | शेळीपालन बाबतचा तपशील<br>• लाभार्थीची स्वत: च्या जुन्या शेळ्यांची संख्या **(शेळी+बोकड =एकूण)**<br>• नव्याने घेतलेल्या शेळ्यांची संख्या **(शेळी+बोकड =एकूण)**<br>• नव्याने घेतलेल्या शेळीची जात/ वर्ग<br>• नव्याने घेतलेल्या शेळीच्या वया बाबतचा तपशील<br>• नव्याने घेतलेल्या शेळ्यांची विमा पावती<br>•<br>• | |
| ७. | शेळ्या व बोकडांची खरेदी मार्गदर्शक सूचनेप्रमाणे केली आहे काय ? | होय/ नाही |
| ८. | **नव्याने विकत घेतलेल्या सर्व शेळ्यांचा विमा उतरविला आहे काय ?** | होय/ नाही |
| ९. | **नव्याने घेतलेल्या शेळ्यांच्या संख्येनुसार आवश्यक आकारमानाचा वाडा व निवा-याची सोय उपलब्ध आहे काय ? (प्रती शेळी -२० चौ. फुट व बोकड- २५ चौ.फुट)** | होय/ नाही |
| १०. | **पाण्याची व खाद्याच्या भांड्याची सोय लाभार्थ्याने केली आहे काय?** | होय/ नाही |
| ११. | **आरोग्य सुविधा व औषधोपचाराबाबत लाभार्थ्याने आवश्यक कार्यवाही केली आहे काय ?**<br>**त्यास याबाबत मार्गदर्शन केले आहे काय ?** | होय/ नाही<br><br>होय/ नाही |
| १२. | अनुदानाची गणना : (**नव्याने खरेदी केलेल्या शेळ्यांची** संख्या, दर, अनुदान मर्यादा, देय अनुदान इत्यादी बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>• प्रकल्प उभारणीची (नव्याने खरेदी केलेल्या शेळ्या व मार्गदर्शक सूचनेनुसार अनुषंगिक खर्च) एकूण किंमत ----------- (रु. मध्ये)<br>**(वाडा, निवारा, पाणी व खाद्याच्या भांड्याची सोय, आरोग्य सुविधा व औषधोपचार** | |

| | |
|---|---|
| | **यासाठीच्या खर्चासह किंवा वाडा, निवारा सोय उपलब्ध नसल्यास सदर बाबीसाठी देय अनुदान वगळून)**<br>• देय अनुदान ---------%<br>• देय अनुदान रक्कम रु. ----------- **(अक्षरी, रु.------------------------------------------)** |

नव्याने खरेदी केलेल्या शेळ्या प्रकल्प मार्गदर्शक सूचनेतील निकषाप्रमाणे असून मार्गदर्शक सूचनेप्रमाणे खरेदी समिती समक्ष खरेदी केलेले आहे. इतर बाबीतही मार्गदर्शक सूचनांचा अवलंब केला असलेने लाभार्थ्यास अनुदान **रक्कम रु. -------------------** अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

समक्ष-

**लाभार्थ्याचे नाव व स्वाक्षरी**

**(श्री./श्रीमती -------------------------)**

**कृषि सहाय्यक**

**(श्री./श्रीमती. --------------------)**

**दिनांकित स्वाक्षरी**

(टिप-सदर तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थ्यास दयावी.)

## प्रपत्र -५
## पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

१. तपासणी दिनांक :- / /२०
२. तपासणी अधिकारी :- श्री. पदनाम
३. तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी -
१. श्री. पदनाम
२. श्री. पदनाम
४. लाभार्थ्याचे नाव - श्री.
गांव ता. जि.
सर्वे नं ( असल्यास )
५. बाब - शेळीपालन
६. प्रकल्पाचे ठिकाण-
७. देयकाची एकुण रक्कम रु. --------
८. लाभार्थ्यास देण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम रु. ---------
९. तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? **होय / नाही**
१०. नसल्यास तफावत रक्कम रु.
११. मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? **होय / नाही**
१२. लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय-

१३. शेळ्यांच्या संख्येबाबत व गुणवत्ते बाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय-

**तपासणी अधिकारी, श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**इतर अधिकारी श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी**
**(नाव...................)**

**प्रपत्र-६**

## लाभार्थी अनुदान मागणी पत्र

**(देयके अपलोड करण्याची आवश्यकता नसून प्रपत्र-६ अपलोड करावयाचे आहे.)**

(प्रकल्पांतर्गत पूर्वीच्या शेळ्या खरेदी केलेल्या लाभार्थ्यांसाठी व शेळी संगोपनासाठी आवश्यक साधन सामुग्रीसाठी)

**प्रति,**

**उपविभागीय कृषि अधिकारी,**
**उपविभाग---------------**
**जिल्हा -----------------**

**विषय:- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत शेळी संगोपनासाठी आवश्यक साधन सामुग्रीबाबत देय अनुदान मिळणेबाबत**

मी, श्री/ श्रीमती---------------------------------------------मु. ----------- पो.------ ता.--------- जि. ----------- आपणास मागणी करतो/करते कि, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत शेळी खरेदीचा लाभ घेतलेला आहे. मी यापूर्वी आपल्या प्रकल्पांतर्गत ---------------- जातीच्या एकूण ------ शेळ्या व ------बोकड खरेदी केलेली असून सध्यस्थिती मध्ये माझ्याकडे ------- शेळ्या व ------ बोकड आहेत. सदर शेळी संगोपनासाठी ---------चौ.फुट आकारमानाचा वाडा/निवारा उभारणीचे काम पूर्ण केलेले असून पाणी व खाद्याची भांडी, आरोग्य सुविधा व औषधोपचाराची सोय केलेली आहे. तरी मला नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मार्गदर्शक सूचनेमध्ये नमूद आर्थिक निकषानुसार देय अनुदान मिळावे. हि विनंती.

**दिनांक:**

**लाभार्थीची सही**
**(नाव व पत्त्यासह)**

**सोबत:**

१. खरेदी देयकांच्या मूळ प्रती

## प्रपत्र-७

## मोका तपासणी अहवाल

(प्रकल्पांतर्गत पूर्वीच्या शेळ्या खरेदी केलेल्या लाभार्थ्यांसाठी व शेळी संगोपनासाठी आवश्यक साधन सामुग्रीसाठी)

## (कृषि सहाय्यक यांनी करणे)

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th colspan="2">बाब</th><th>तपशील</th></tr>
<tr><td>१.</td><td colspan="2">लाभार्थ्याचे नाव</td><td></td></tr>
<tr><td>२.</td><td colspan="2">गावाचे नाव</td><td></td></tr>
<tr><td>३.</td><td colspan="2">तपासणी दिनांक</td><td></td></tr>
<tr><td>४.</td><td colspan="2">बाब</td><td>शेळीपालन (शेळी संगोपनासाठी आवश्यक साधन सामुग्री)</td></tr>
<tr><td>५.</td><td colspan="2">या पूर्वी प्रकल्पांतर्गत शेळी खरेदीचा लाभ घेतलेल्या अर्जाचा क्रमांक</td><td></td></tr>
<tr><td>६.</td><td colspan="2">प्रकल्पांतर्गत पूर्वी खरेदी केलेल्या शेळ्यांचा तपशील</td><td>शेळी संख्या - ---------<br>बोकड संख्या - ---------</td></tr>
<tr><td>७.</td><td colspan="2">सध्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या शेळ्यांचा तपशील</td><td>शेळी संख्या- --------<br>बोकड- ----------</td></tr>
<tr><td>८.</td><td>वाडा, निवारा उपलब्ध असलेबाबतचा तपशील (प्रती शेळी २० चौ.फुट व बोकड साठी २५ चौ.फुट)</td><td>१ आवश्यक चौ. फुट<br><br>२ प्रत्यक्ष चौ. फुट</td><td>------------<br><br>-----------</td></tr>
<tr><td>९.</td><td colspan="2">शेळ्यांच्या संख्येनुसार आवश्यक आकारमानाचा वाडा व निवा-याची सोय मार्गदर्शक सूचनेनुसार केली आहे काय ?</td><td>होय/ नाही</td></tr>
<tr><td>१०.</td><td colspan="2">पाणी व खाद्य भांड्याची सोय लाभार्थ्याने केली आहे काय?</td><td>होय/ नाही</td></tr>
<tr><td>११.</td><td colspan="2">आरोग्य सुविधा व औषधोपचाराबाबत लाभार्थ्याने आवश्यक कार्यवाही केली आहे काय ?<br>त्यास याबाबत मार्गदर्शन केले आहे काय ?</td><td>होय/ नाही<br><br>होय/ नाही</td></tr>
<tr><td>१२.</td><td colspan="3">अनुदानाची गणना : (अनुदान मर्यादा, देय अनुदान इत्यादी बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>• वाडा/निवाऱ्याचा एकूण खर्च -------------- (रु. मध्ये)<br>• पाणी व खाद्याच्या भांड्यांचा खर्च -------------- (रु. मध्ये)<br>• आरोग्य सुविधा व औषधोपचार यासाठीच्या खर्च ------------ (रु. मध्ये)<br>• एकूण खर्च रु.----------------<br>• देय अनुदान ---------%<br>• एकूण देय अनुदान रक्कम रु. ------------ (अक्षरी - -------------------------------------------------)</td></tr>
</table>

सदर लाभार्थीने शेळीपालन या घटकांतर्गत शेळी संगोपन साधन सामुग्रीची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनेतील निकषाप्रमाणे केलेली असल्याने लाभार्थ्यास देय अनुदान रक्कम रु. -------------- अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

समक्ष-

| | |
|---|---|
| **लाभार्थ्याचे नाव व स्वाक्षरी** | **कृषि सहाय्यक** |
| **(श्री./श्रीमती ------------------------------)** | **(श्री./श्रीमती. -----------------------------)** |
| | **दिनांकित स्वाक्षरी** |

(**टिप**-सदर तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थ्यास दयावी.)

# भूमिहीन असल्याबाबत स्वयंघोषणापत्र

मी, श्री/श्रीमती----------------------------------- रा. ------------- ता. --------------- जि. ---------

माझ्या कुटुंबातील सदस्य खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कुटुंबातील सदस्यांची नावे | वय | नाते |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

माझ्या अथवा माझ्या कुटुंबातील वर नमूद सदस्यांपैकी कुणाच्याही नावावर कोठेही शेतजमीन नाही.

सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/ किंवा संबधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्राद्वारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यात येतील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण: ..........................

अर्जदाराची सही: ....................................

दिनांक: .........................

अर्जदाराचे नाव : .....................................

(सोबत- तलाठी/तहसिलदार यांचे कुटुंब भूमिहीन असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.)

# स्वयंघोषणापत्र

(विधवा महिलांसाठी)

मी ........................................................ विधवा असून पुनर्विवाह न केल्याचे स्वयंघोषित करत आहे. (नवऱ्याच्या मृत्यू नोंद दाखल्याची प्रत सोबत जोडलेली आहे.)

मी ................................................. श्री. ................................................... यांचा मुलगा/मुलगी वय .................वर्षे, आधार कार्ड नंबर क्रमांक. ................................ व्यवसाय ....................... राहणार ............................. याद्वारे घोषित करते कि, वरील माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/ किंवा संबधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्राद्वारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यात येतील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण: .........................

दिनांक: .........................

अर्जदाराची सही: ...................................

अर्जदाराचे नाव : ....................................

## स्वयंघोषणापत्र

(परितक्त्या महिलांसाठी)

मी ..........................................................परितक्त्या असून मला नवऱ्याने सोडल्याचे/नवऱ्यास सोडल्याचे स्वयंघोषित करत आहे. (मा. न्यायालयाचे /सक्षम प्राधिकाऱ्याचे याबाबतचे आदेश सोबत जोडले आहेत.)

मी .................................................... श्री. ..................................................... यांचा मुलगा/मुलगी वय ..................वर्षे, आधार कार्ड नंबर क्रमांक. ................................. व्यवसाय ........................ राहणार .............................. याद्वारे घोषित करते कि, वरील माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/ किंवा संबधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्राद्वारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यात येतील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण: ..........................  अर्जदाराची सही: ....................................

दिनांक: .........................  अर्जदाराचे नाव : .....................................

# स्वयंघोषणापत्र

(घटस्फोटीत महिलांसाठी)

मी ........................................................... घटस्फोटीत असल्याचे स्वयंघोषित करत आहे. (मा. न्यायालयाचे /सक्षम प्राधिकाऱ्याचे आदेश सोबत जोडले आहेत.)

मी ................................................... श्री. .................................................... यांचा मुलगा/मुलगी वय ..................वर्षे, आधार कार्ड नंबर क्रमांक. ................................ व्यवसाय ........................ राहणार ............................. याद्वारे घोषित करते कि, वरील माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/ किंवा संबधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्राद्वारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यात येतील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण: .........................     अर्जदाराची सही: ...................................

दिनांक: .........................     अर्जदाराचे नाव : ....................................